सकाळ
सिंधुदुर्ग, सोमवार,
३० मार्च २०१५

# सुंदर आयुष्यासाठी पर्यावरण जपा

## खासदार विनायक राऊत : दोडामार्गात राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‍घाटन

सकाळ वृत्तसेवा

दोडामार्ग, ता. २९ : 'आयुष्य सुंदर बनवायचे असेल, तर पर्यावरण जपावे', असे आवाहन खासदार विनायक राऊत यांनी येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात केले.

महाविद्यालयात भारतीय सामाजिक शास्त्रे अनुसंधान परिषद, मुंबई पुरस्कृत पश्चिम घाट, जागतिक वारसा, पर्यावरण आणि विकास या विषयावरील दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‍घाटन झाले. त्या वेळी खासदार राऊत बोलत होते.

या वेळी त्यांनी पूर्वीचे कोकण व आताचे कोकण यातील फरक स्पष्ट केला. दिवसेंदिवस पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. पर्यावरण रक्षण काळाची गरज आहे; मात्र त्यासाठी मोठी सामाजिक चळवळ उभी रहायला हवी, असे राऊत म्हणाले. अध्यक्षस्थानी नवनिर्माण शिक्षण संस्थेचे (रत्नागिरी) अभिजित हेगशेटये होते. चर्चासत्रात महाराष्ट्र, केरळ, कर्नाटक व गोवा येथील पर्यावरण अभ्यासक, तज्ज्ञ, पर्यावरणप्रेमी, विद्यार्थी, प्राध्यापक आदी उपस्थित होते.




**दोडामार्ग : येथे पर्यावरण आणि विकास या चर्चासत्रात मार्गदर्शन करताना खासदार विनायक राऊत. शेजारी अभिजित हेगशेटये आदी.**

खासदार राऊत यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या वेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, प्रा. डॉ. राजेंद्र केरकर, डॉ. एस. ए. ठाकूर, डॉ. हेमंत पेडणेकर, विवेकानंद नाईक, महाविद्यालयाच्या स्थानिक समितीचे सदस्य बाबूराव धुरी, भाई परमेकर, सूचन कोरगावकर आदी उपस्थित होते.

प्राचार्य पाटील यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. प्रा. डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संजय खडपकर यांनी आभार मानले.